
RAUNAK
BANDELKAR
स्वत:च्या सोयीनं सत्य मांडणं म्हणजे तुम्हां लोकांचं राजकारण, समाजाच्या भल्यासाठी सत्य सांगणं म्हणजे आमची पत्रकारिता!
DR. SHRIRAM LAGOO
DILIP PRABHAVALKAR
SACHIN KHEDEKAR
SULABHA DESHPANDE
NEENA KULKARNI
DEVIKA DAFTARDAR
RAJESH SHARMA
MILIND SOMAN
SACCHI ENTERTAINMENT
& RAUNAK BANDELKAR present
नागरिक
a film by JAYPRAAD DESAI
produced by ARTI SACHIN CHAVAN
TRUTH REVEALS ON 12 JUNE 2015
co-producer DR. SUNIL CHAVAN associate producer VIKRANT CHAVAN screenplay MAHESH KELUSKAR, JAYPRAAD DESAI story-dialogues MAHESH KELUSKAR
director of photography DEVENDRA GOLATKAR lyrics SAMBHAJI BHAGAT, CHANDRASHEKHAR SANEKAR kind support YUVRAJ MOHITE music TUBY-PARIK
poetry music SAMBHAJI BHAGAT production designer SUKANT PANIGRAHY sound designer RESUL POOKUTTY, AMRIT PRITAM editor GORAKSHNATH
make-up & hair design VIKRAM GAIKWAD costume design BHANU ATHAIYA, PURNIMA OAK art director VIJAY KADALI, SHRADDHA VASUGAVADE
choreographer SUBHASH NAKASHE publicity co-ordinator RAM KONDILKAR Media Planner RAINDROP MEDIA
executive producer JITENDRA KULKARNI visual promotions JUST RIGHT STUDIOZ publicity design SACHIN SURESH GURAV
/NagrikTheFilm
/NagrikTheFilm
khushi

# जयप्रद देसाई





सिनेमा, चित्रपट, फिल्म... आपण ताबडतोब रसिक प्रेक्षकाच्या भूमिकेत जाऊन बसतो. निर्माता, दिग्दर्शक या भूमिकेत नाही. कारणं अनेक....पण त्यातलं महत्वाचं कारण म्हणजे सिनेमा हे अत्यंत खर्चिक प्रकरण आहे 'ये अपने बसकी बात नही....' असेच विचार मनात येतात. आणि मग 'रसिक प्रेक्षक' हीच भूमिका सोयीची आणि सोपी वाटते. पण सिनेमा बनवणं हे तुम्हा-आम्हाला कोणालाही शक्य आहे.... असं जर मी म्हटलं तर ?...खरं नाही ना वाटत ?

जयप्रद देसाई या तरुणाने ते करुन दाखवलंय....

जयप्रद हा तरुण कम्प्युटर सायन्स विषय घेऊन इंजिनियर झाला. इंजिनियरिंग करत असतानाच सतत नाटकातून भाग घे, वेगवेगळे प्रयोग कर असे उपक्रम चालत. नाटक करताना दिग्दर्शनात रस वाटायला लागला. मित्रांनी मिळून एक ग्रुपही स्थापन केला. सगळे मिळून वाचनही खूप करत. जयप्रदला डोस्टोव्हस्की आवडू लागला. त्याच्या लिखाणातलं मानवतेचं मूल्य जयप्रदला खूपच भावतं. सहजगत्या, साधं काही सांगता सांगता तुम्हाला अंतर्मुख व्हायला लावण्याचं डोस्टोव्हस्कीचं कसब जयप्रदला आवडलं. मग निकोलाई गोगोल, चेकॉव्ह, काफ्का डोस्टोव्हस्कीसोबतच जयप्रदभोवती जमा झाले. इंग्रजीतल्या वाचनाबरोबर मराठी वाचन प्रयत्नपूर्वक सुरु झालं.

याच दरम्यान जगयप्रदने काही जाहिरातींसाठी मॉडेलिंगही सुरु केलं. आपल्याला फिल्म क्षेत्रात जास्त रस आहे, हे जयप्रदला लक्षात आलं. फिल्म हे प्रभावी माध्यम आहे आणि आपण त्याला हाताळू शकतो या भावनेतून अमर दामले यांच्या पुढाकाराने 'स्पंदन' ग्रुप कामाला लागला. सगळयांनाच सिनेमाचं प्रचंड आकर्षण होतं. आज सिनेमा बनवणारी दिग्गज असणारी सगळी मंडळी सर्वसामान्यांना  दुस-या जगातली वाटतात. आपल्या जगाशी त्यांचा काही संबंधच जाणवत नाही. त्यामुळे त्या संवेदना, तो परिणाम आपला वाटतच नाही. आज लोक जे जगत आहेत, अनुभवत आहेत त्याच गोष्टी का सांगू नयेत असे विचार या मुलांच्या मनात वारंवार येत. त्यामुळे सिनेमा बनवणारे आणि ज्यांच्यासाठी बनवायचा असे लोक यांच्यातलं अंतर कमी झालं पाहिजे हा विचार पक्का होऊ लागला. स्पंदनगटात दाखल होणा-यांची संख्या वाढू लागली. आज स्पंदन हा 150 अशा समविचारी सिनेमावेडयांचा गट आहे.

सुरुवातीला अगदी साधा डिजिटल कॅमेरा धेऊन काम सुरु झालं. शॉर्ट फिल्म करुन पहावी असं मनात आलं. सिनेमाचं आकर्षण हा सगळयांमधला कॉमन पॉईंट होता. पण त्यातली तंत्र, बारकावे कोणालाही माहीत नव्हते. , टॉप ॲन्गल म्हणजे काय वगैरे काहीही कळत नव्हत. इमारतीवरुन बघितलं की टॉप ॲन्गल  आणि सायकलवरुन शॉट घेतला की मुव्हिंग ॲन्गल इतकेच काय ते अर्थ लागत होते. पण तरीही सामान्य माणूस सिनेमा बनवू शकतो आणि तोही कमी खर्चात हा विश्वास सोबत होता.




जयप्रद आणि त्याच्या मित्रांनी 'फिल्म कार्यशाळा घेण्यास सुरुवात केली. या कार्यशाळेत सिनेमा करण्यासाठी तुमचा दृटिकोन कसा असावा यावर भर दिला जातो. तंत्र शिकवणारे क्लासेस अनेक असतात पण मंत्र कोणीच देत नाही, सांगत नाही. नेमकं हेच या कार्यशाळेतचं वैशिष्टय आहे. या मंत्रासाठी ज्ञानार्जनाचा दृष्टिकोन लागतो. शिक्षणालासुद्धा एक अजेंडा लागतो. कशासाठी ? हा प्रश्न खूप महत्वाचा आहे. त्यामुळे या कार्यशाळेत मुलांना तंत्र न शिकवता सिनेमाची भाषा शेअर केली जाते. खूप इंटरेस्टिंग

असे सेशन्स यात असतात. उदाहरणार्थ, तुम्हाला नवा सिनेमा काढायचा आहे. तर एक नवीन भाषा तयार करा. यातून अनेक गंमतीजंमती घडतात आणि नव्या भाषेचा जन्म होतो. या कार्यशाळेतून स्वतःचा आत्मविश्वास वाढतो, मर्यादाही कळतात आणि चर्चा, खेळातून नव्या आयडिया समोर येतात.



जयप्रदला घरुन त्याने काय शिकावं, कसं शिकावं याबाबत कधीच विरोध नव्हता. पण फॉर्मल शिक्षण त्याने आधी पूर्ण करावं एवढाच एक आग्रह होता. आणि जयप्रदने इंजिनियर होऊन तो सिद्ध केला. वसंत देसाई ज्या नावाला भारतीय सिनेसृष्टी कधीच विसरु शकत  नाही. ते जयप्रदचे आजोबा. वारश्याने सगळं काही येतंय अशी समजूत करुन न घेता आपण फिल्ममधली तंत्र नीट समजून घेतली पाहिजेत, आपल्याला दृष्टिकोन तर आहे, अॅप्रोच आहे पण आता त्यातलं शास्त्रशुद्ध शिक्षणही घेतलं पाहिजे या विचारानं जयप्रदनं फिल्म इन्स्टिट्यूट (एफटीआय) जी भारतातली नामांकित संस्थ्ज्ञा आहे तिथे अप्लाय केलं. त्याचं काम, त्याचा अप्रोच पाहून ती लोकं म्हणाली, 'अरे जे आम्हाला सांगायचं, शिकवायचं आहे ते तुला आधीच माहीत आहे...तुला या कोर्सची गरजच नाही'. इंटरव्यू घेणा-या पॅनेलला जयप्रदने 'मला शिकायचंय, तंत्र समजून घ्यायची आहेत' हे परोपरीनं सांगायचा प्रयत्न केला पण त्यांना ते पटलं नाही मग जयप्रदने भारताबाहेर प्रयत्न केलें आणि त्याला स्कॉलरशिप मिळाली आणि तो न्यूयॉकर्ला फिल्मसंबंधी (मास्टर ऑफ फाईन आर्ट) शिक्षण घेण्यासाठी रवाना झाला.

स्पंदनमध्ये काम करताना आपल्याला बरंच काहीतरी येतंय असं वाटायचं. पण न्यूयॉर्कला पोहोचताच आपली स्थिती कूपमंडूक होती हे जयप्रदला लक्षात आलं. इथे जपान, ब्राझील, आखाती देशातले सिनेमावेडे जमले होते. प्रत्येकजण जमेल तशा पध्दतीने  मोडक्या  तोडक्या भाषेत संवाद साधायचा प्रयत्न करत होता. प्रत्येकजण एक वेगळं जग घेऊन तिथे आला होता. इतकी एकत्रं आलेली जगं पाहून जयप्रद विस्मित झाला. हे सगळं  विलक्षण होतं. इथे शिकताना खूप स्वातंत्र्य  होतं. प्रत्येक कलाकार हा ओरिजनल असतो. एकाच साच्यात सगळ्यांना बसवलं तर मग कलेचं मोजमाप करता येत नाही. हे त्याला दिसून आलं.

जगभरातले सिनेमे जयप्रदला बघायला मिळाले. एका वेगळ्या देशात जाऊन रहाणं, स्वतः कमावणं आणि शिकणं हा खूप वेगळा अनुभव होता. अजून कोणाशी तशी जवळीक निर्माण होण्याआधीच म्हणजे तीनच महिन्यांनी जयप्रदचा एक मोठा अपघात झाला. जयप्रद वाचला पण तीन आठवडे व्हील चेअरवर ...गुडघ्याचं ऑपरेशन करावं लागलं...डोक्यावर स्टीचेस...पहिले सहा महिने आजारपणातून बरं होण्यात गेले.  आभाळ कोसळल्यासारखी स्थिती होती. अमेरिकेत मेडिकलची स्थिती खूपच भयानक आहे. तिथे आजारी पडण्यापेक्षा मरण परवडलं असंच म्हणण्याइतके मेडिकल उपचार महागडे आहेत. हे सगळं निस्तरनाही परत जायचं नाही हा जयप्रदचा निर्धार पक्का होता. या दिवसांमध्ये एकदा मरण बघितलं की मग पुढचं आयुष्य खूप सोपं होतं हे जयप्रद शिकला. आणि या अपघाताने जयप्रदला एक अतिशय संवेदनशील फिल्म मेकर बनवण्यास मदत केली.

या काळात जयप्रद हम होंगे कामयाब हेच गाणं गुणगुणायचा. हे गाणं त्याला आधार देणारं वाटायचं. या अपघातानंतर जयप्रदचं व्यक्तिमत्व खूप बदललं. कुटुंबाच्या व्याख्या बदलल्या. एका मर्यादित कुटुंबातून विस्तारित कुटुंबाची निर्मिती झाली. कुटुंब कशासाठी असतं ? त्यात काय असायला हवं ? आणि हेच सगळं मग स्पदंनमध्ये असायला हवं या जाणिवेतून स्पंदनही विकसित होऊ लागलं. या अपघातामुळे कितीतरी वेळ एकटयाला काढावा लागत होता. त्या वेळात शिवाय आराम काहीही

करता येणं शक्य नव्हतं. पण या एकटेपणानं जयप्रदला अंतर्मुख होऊन विचार करायला शिकवलं आणि कित्येक कोडी अंतर्मुख झालं की सुटतात हेही लक्षात आलं.

'डीपर यू गो, हायर यू रिच' हा विचार भावला. त्याने 'रोज बुश' ही पहिली फिल्म आपल्या प्रोजेक्ट अंतर्गत बनवली. एका जोडप्याची ही कहाणी...आपल्या तरुण मुलाच्या मृत्यूला एक वर्ष झाल्याच्या दिवशी हे जोडपं एकत्रा येतं...त्यांच्यातलं नातं आणि त्या नात्याचे उलगडत जाणारे अनेक पदर या एका रात्रीत घडलेल्या फिल्ममधून जयप्रदने दाखवले होते. या त्याच्या फिल्मला उत्कृष्ट स्क्रीन प्ले, मोस्ट प्रॉमिसिंग फिल्मचं राष्ट्रीय स्तरावरचं ॲवार्ड मिळालं. ही स्पंदनसाठी, जयप्रदसाठी आणि जयप्रदच्या कुटूंबासाठी खूप अभिमानाची गोष्ट होती. एका जीवावर बेतलेल्या आजारपणानंतर काहीच दिवसात 'हम होंगे कामयाब'च म्हणत जयप्रदने हे असाध्य असं काम करुन दाखवल होतं.

शिक्षण होताच लॉस एन्जेलिस येथे जयप्रदला सोनी कोलंबिया इथे नोकरीही मिळाली. त्याचवेळी जयप्रदला एक दिवस वेगवेगळ्या साईट सर्च करताना सर्चची साईट दिसली. निर्माण उपक्रमाची माहिती मिळाली आणि मग जयप्रदने निर्माणला अप्लाय केलं.

याचवेळी मला माझ्या गोष्टी माझ्या लोकांच्या गोष्टी सांगायच्या आहेत ही भावना प्रखर होऊ लागली. माझी संवेदनशीलता भारतीय मनाची आहे. मी तिथेच जायला हवं हा विचार पक्का होऊ लागला. सत्यजीत रे दिसू लागले. ते तर आंतरराष्ट्रीय कीर्तीचे फिल्म मेकर होते पण ते तर भारतातच राहिले ना...असं मन म्हणू लागलं. त्याचवेळी अनिल अवचट यांचं 'कार्यरत' वाचलं. निर्माणमध्ये दाखल झालेल्या जयप्रदला अनेक गोष्टी निर्माणमुळे कळाल्या. 'सामाजिक कार्य करताना संवेदनशील असायला हवं पण त्यात वाहून जाता कामा नये' ही महत्वाची गोष्ट त्याला समजली. सामाजिक काम करताना सुसूत्रपणे, नीट बांधणी होणं आवश्यक असतं. जयप्रदने निर्माणच्या पाच उच्चशिक्षित अशा फेलोशिप घेतलेल्या युवांचा प्रवास या फिल्ममध्ये चित्रित केला. त्यासाठी तो प्रत्येक फेलो ज्या ज्या भागात जाऊन काम करत होता तिथे तिथे आपल्या सहकारी मित्रांसोबत जयप्रद जाऊन पोहोचला. गडचिरोलीच्या नक्षलाईट भागापासून ते धडगावसारख्या दुर्गम आदिवसी भागातही जयप्रद भर उन्हात कॅमेरा घेऊन फिरत होता.



याच दरम्यान जयप्रद रेणू गावस्कारांसोबत एक हिंदी फिचर फिल्म करत होता. रेणू गावस्कर यांचं निःशब्द झूंज आणि आमचा काय गुन्हा ही पुस्तकं वाचून जयप्रद प्रभावित झाला होता. त्याने रेणू गावस्करांची भेट घेतली त्यांचं काम बघितलं रिमांड होममधली मुलं..त्या मुलांची ओळख..गप्पा यातून फिल्म करावी अशी कल्पना पुढे आली. जयप्रदने मेधा पाटकरांच्या सोबत फिरुन आदिवसी मुलांच्या जीवनशाळा अभ्यासल्या आणि तिथल्या मुलांसोबतही कार्यशाळा घेतल्या. तसंच त्याचवेळी 'स्वराज्य' नावाची फिल्मचं कामही सुरु होतं.

हे करत असतानाच त्याला औरंगाबादमध्ये बशर नवाज नावाची एक उर्दू शायरीच्या जगातली महान हस्ती असल्याचं समजलं. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईद्वारा ही फिल्म करायची ऑफर आली. बशर नवाज नवाज नाव त्यानं कधी

ऐकलेलं नव्हतं. जयप्रद बशर नवाज यांना भेटला आणि तो त्या माणसाच्या चक्क प्रेमातच पडला. ऐकीव माहिती तितकीशी प्रभावी नसते. तो अनुभव पोहचला तर तो किती प्रभावी असतो याचं प्रत्यंतर त्याला बशर नवाजांना भेटून आलं. आणि या सगळ्यांसाठी फिल्म हे माध्यम किती किती प्रकारे प्रभावशाली आहे हे त्याला पुन्हा एकदा लक्षात आलं.

निर्माणची फिल्म करतानाचा अनुभव वेगळा होता, बशर नवाजांची फिल्म करतानाचा अनुभव त्याहीपेक्षा वेगळा होता. विषयांना देखील त्यांची एक जात असते हे जयप्रद शिकला. या फिल्मच्या निमिताने उर्दू, शेरशायरी या जगाशी ओळख झाली. गझलमधले बारकावे कळू लागले. हा आयुष्य बदलवणारा असा अनुभव होता असं जयप्रदला वाटतं. या प्रत्येक फिल्मनंतर रिबॉर्नचा अनुभव मला येतो असं जयप्रद म्हणतो.

निर्माणशी नातं निर्माण झालं आणि जयप्रदने मुंबईला निर्माणच्या आफीसमध्ये दोन वर्षांपासून फिल्म क्लब सुरु केला. फिल्म फिल्म असते तिला साच्यात बसवू नये असं जयप्रदला वाटतं. कुठलाही चांगला सिनेमा हा सामाजिक भान देणाराच असतो असं तो आवर्जून सांगतो. बायसिकल थीफ पासून फिल्म क्लबमध्ये सुरु झालेला सिनेमा हा क्लासिक होता पण त्याच्याच नंतरचा सिंगिंग इन द रेन या 1960 चा सिनेमा म्हणजे हॉलिवूडची म्युझिकल डान्सवरचा अप्रतिम फिल्म आणि मग हा सिलसिला मुंबईकरांसाठीच आजतागायत चालूच आहे.



आपल्याला संवाद साधणं तितकंस अजून जमत नाही. ही आपली मर्यादा आहे असं जयप्रदला वाटतं आणि आपण आपल्या कामातून जास्त चांगलं व्यक्त होतो असंही तो म्हणतो. जयप्रद स्वतः स्क्रीनप्लेही लिहितो. आपण चांगले प्रेक्षक आहोत असं तो म्हणतो, त्यामुळे अप्लाईड, ॲडॉप्टींग रायटिंग आपण चांगलं करु शकतो असं त्याला वाटतं. प्रत्येक प्रसंग, कथानक, गोष्ट, त्याला फिल्मसारखी वाटते.

सत्यजीत रेचा प्रभाव असणा-या जयप्रदला राजकपूर, विजय आनंदसारखे दिग्दर्शक आवडतात. पिपली लाईव्ह, धोबीघाटसारखे वेगळे चित्रपट वेगळा प्रवाह दाखवणारे अमीर खानसारखे तरुण निर्माते तसंच राजकपूरसारखे दिग्दर्शक जयप्रदला सतत प्रोत्साहित करतात.

आज स्पंदनसोबत तळातल्या युवांपासून मध्यमवर्गातले अनेक युवा जोडले जात आहेत. त्यामुळे आपल्यापासून दूर असलेलं माध्यम आता आपल्या हातात आल्याचा आनंद ते घेत आहेत. हमारी मुठ्ठीमे आकाश सारा म्हणणा-या जयप्रदसोबत तुम्हालाही बनवायचीय फिल्म ?

दीपा देशमुख adipaa@gmail.com जयप्रद देसाई jayprad@yahoo.com

Interview about movie Nagrik https://www.youtube.com/watch?v=iRSG9seSTyI

NIRMAN interview on IBN Lokmat https://www.youtube.com/watch?v=6RXxMC69xys

Making of Nagrik https://www.youtube.com/watch?v=oZ5wkGDBX9o

Nagrik review Times of India http://timesofindia.indiatimes.com/entertainment/marathi/movie-reviews/nagrik/movie-review/47689820.cms

Jayprad's movie Nagrik won five awards at the 52nd Maharashtra State Awards including Best Social Film, Director, Dialogue, Lyrics and Cinematography. It also won the award for the Best Actor in a Negative Role for Milind Soman and Special Jury award for director Jayprad Desai at MICTA 2016, Sydney. Other awards include Prabhat Puraskar, Sahyadri awards and others.












SBI Card
OLA


The opening scene to the movie UP HD
4:46 / 7:24